शुक्रवार, दि. २० जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३१५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## अंशत: अनुदानित शिक्षकांचे वाढीव टप्प्यासाठी आझाद मैदान मुंबई येथे बेमुदत धरणे आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** आझाद मैदान मुंबई येथे महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समिती च्या वतीने दि. १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयासाठी लागणाऱ्या सुमारे ११०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करून अंमलबजावणी व्हावी या व इतर मागण्यासाठी भर पावसात आंदोलन सुरू आहे या आंदोलनास राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांचा वाढता पाठिंबा मिळत असल्याचे दिसत आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात दिनांक १० ऑक्टोंबर २०२४ च्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी राज्यातील सुमारे ५३ हजार शिक्षकांना वाढीव टप्पा देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला परंतु या निर्णयासाठी लागणाऱ्या सुमारे ११०० कोटी रुपयांची तरतूद हिवाळी अधिवेशन व अर्थसंकल्पीय अधिवेशनात शासनाने केली नसल्याने राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षक बांधवात कमालीची नाराजी पसरली असून, यासाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांच्या नेतृत्वात राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांनी आझाद मैदान मुंबई बेमुदत धरणे आंदोलन येथे पुकारले आहे.

या आंदोलनात दरम्यान संघटनेच्या शिष्टमंडळाने राज्यातील शिक्षक व पदवीधर आमदार विक्रम काळे, किरण सरनाईक, जयंत आसगावकर, किशोर दराडे, सत्यजित तांबे, यांच्या नेतृत्वात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, व शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मुंबईत भेटी घेऊन या शासन निर्णयासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद आगामी पावसाळी अधिवेशनात करावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

### २३ व २४ जून रोजी शिक्षकांनी सहभागी व्हावे - लोखंडे

राज्याचे पावसाळी अधिवेशन ३० जून पासून सुरू होत असून या अधिवेशनातील पूरक मागण्या मंजूर करण्यासाठीची व्यय अग्रक्रम समितीची बैठक ही दि. २४ जून रोजी होणार असून या बैठकीत हा प्रश्न मार्गी लावायचा असेल तर राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांनी दोन दिवस म्हणजेच २३ व २४ जून रोजी आझाद मैदानावर मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन कृती समितीचे जालना जिल्हा अध्यक्ष सदानंद लोखंडे यांनी केले आहे.




## शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी विश्वपदयात्रा

### जालना शहरात जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वागत



**जालना । प्रतिनिधी -** जनतेमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांतविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी विश्वशांती विश्वपदयात्रा घेणारी पर्वतोरोहींची चमू जालना जिल्ह्यात दाखल झाली आहे. या विश्व पदयात्रेचे नेतृत्व करणाऱ्या गिनीज बुक व लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर अवध बिहारी लाल यांच्या चमूने जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची भेट घेतली.

ही यात्रा डेंजर्स डव्हेंचर्स अंतरवेद स्पोर्ट्र्सतर्फे राबविण्यात येत आहे. या चमूत जितेंद्र प्रताप, महेंद्र प्रताप, गोविंदा नंद हे पर्वतारोही सहभागी आहेत. या यात्रेने आतापर्यंत ११ देशांमध्ये एकूण ४.४८ लाख किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण केला असून २०१८ मध्ये जगातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंतची यात्रा यशस्वीरीत्या पूर्ण केली. यात्रेच्या माध्यमातून १४ कोटी ५० लाख वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

देशभरातील ६०० हून अधिक जिल्ह्यांमध्ये ही पदयात्रा झाली असून उत्तराखंड, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश, गुजरात तसेच दमन-दीव व दादरा नगर हवेलीमध्येही जनजागृती कार्यक्रम राबवले गेले आहेत. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांपैकी २९ जिल्ह्यांमध्ये यात्रा झाली असून त्यांनी जालना जिल्ह्यात आरटीओ, वनविभाग पान २ वर

युवा आदर्श

### आंदोलन...

गुडघाभर पाण्यात
रे जलसमाधी घेता
राणा भीमदेवी थाटा
पुढे उभारतो नेता
प्राणांतिक उपोषण
रिल्स छान काढता
लांबू लागते उपोषण
पाय घेतात काढता
रेल्वे रूळावरी पहुडे
कसा आंदोलनकर्ता
आज हा मेगा ब्लॉक
नेमके कसे विसरता
निदर्शने मोठ मोठ्या
कॅमेरा जरासा वळता
कार्य भाग संपन्न होता
हळूचं लांबवर पळता
शोले आंदोलन आवडे
टाकीवर लगेचं चढता
भिती वाटे मरण्याची
जरासा उद्रेक वाढता
वाचाळवीराचे तोंडास
चिखल शेण फासता
आपल्या हाता घाण
चालवी उद्योग नसता
मूक मोर्चांत अग्रभागी
दिमाखे कसे मिरवता
स्वार्थापोटी आंदोलने
मग स्वतांमध्ये हरवता

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### हिंदी सक्ती विरोधात मनसे आक्रमक

## शासन निर्णयाची काळी शाई टाकून होळी

**जालना । प्रतिनिधी -** हिंदी भाषा सक्तीच्या विरोधात काल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेतल्यानंतर मनसेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.

गुरुवार (दि.१९) रोजी दुपारच्या सुमारास जालना शहरातील बस स्थानक परिसरात मनसे कार्यकर्त्यांनी राज्य सरकारने काढलेल्या हिंदी भाषा सक्तीच्या शासन निर्णयाच्या प्रतवर काळ्या रंगाची शाई टाकून या निर्णयाची होळी केली. तसेच राज्य सरकारचा निषेध नोंदवला. यावेळी मनसे कार्यकर्त्यांनी राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. हिंदी भाषा सक्तीची करून राज्य सरकार मराठी भाषेचं महत्व कमी करत असल्याचा आरोप मनसेनं केला आहे. यापुढे राज्य सरकारने महाराष्ट्रात हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न केला तर तो हाणून पाडू असा ईशारा मनसेच्या वतीनं देण्यात आलाय.

यावेळी माध्यमांशी संवाद साधत असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष रवी राऊत म्हणाले की यापूर्वी सुद्धा महाराष्ट्र सरकारने हिंदी भाषा महाराष्ट्रावर लादण्याचा प्रयत्न केला होता परंतु महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने त्यास कडाडून विरोध केल्याने शासनाने काढता पाय घेतला. परंतु आता पुन्हा महाराष्ट्र सरकार हिंदी भाषा राज्यावर लादण्याचे प्रयत्न करत असल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेना रस्त्यावर उतरली असून हिंदी भाषा कदापिही लादून घेणार नाही असा कडक इशारा मनसेचे जिल्हाध्यक्ष रवी राऊत पान २ वर



## इनरव्हील होरायझन क्लबतर्फे जन्मजात अपंगत्व असलेल्या ४२ बालकांना सहाय्यक उपकरणे प्रदान




**जालना । प्रतिनिधी -** जन्मजात विविध प्रकारचे शारीरिक अपंगत्व असणाऱ्या बालकांचे जीवन अधिक सुसह्य आणि सक्षम करण्यासाठी इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत ४२ दिव्यांग बालकांना त्यांच्या गरजेनुसार ऑर्थोसिस आणि प्रोस्तोसिस ही सहाय्यक उपकरणे प्रदान करण्यात आली.

हा कार्यक्रम गुरुवार, दि. १९ जून रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या जिल्हा प्रारंभिक हस्तक्षेप केंद्रात संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. गाडेकर, बालरोगतज्ज्ञ डॉ. बेदेलर आणि डॉ. अर्चना खंडागळे, डॉ. कुलकर्णी, जिल्हा प्रारंभिक हस्तक्षेप केंद्राच्या डॉ. मीनल देवळे, डॉ. शितल भालेराव, अमित जयस्वाल इनरव्हील क्लब होरायझनच्या अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत, सचिव पिंकी लड्डा आणि मिनल जयस्वाल यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. पाटील यांनी क्लबच्या या उपक्रमाचे कौतुक करून, यापुढेही अशा प्रकारचे उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रास्ताविकपर भाषणात ड. अश्विनी धन्नावत म्हणाल्या की, अनेक बालकांना जन्मजात मानेत, पाठीच्या कण्यामध्ये, हातापायात किंवा इतर अवयवांमध्ये व्यंग असते. अशा मुलांना चालणे, उठणे किंवा बसणे कठीण जाते. यासाठीच त्यांच्या शारीरिक क्षमतेनुसार योग्य सहाय्यक साधनांची निवड करण्यात आली. ऑर्थोसिस आणि रोस्तोसिस इक्विपमेंट या दोन्ही प्रकारची उपकरणं ही अपंगत्व असलेल्या व्यक्तींना किंवा हाड, स्नायू आणि मज्जासंस्था यांच्याशी संबंधित अडचणी असलेल्या रुग्णांना मदत करणारी असतात. ही उपकरणं रुग्णाच्या हालचाली सुधारण्यासाठी, वेदना कमी करण्यासाठी आणि शरीराला योग्य आधार देण्यासाठी वापरली जातात. या उपकरणांमुळे त्यांच्या जीवनात पान २ वर

## दृष्टी लायन्स नेत्रालय परतूर येथे सीईटी व नीट परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**परतूर । प्रतिनिधी -** लायन्स क्लब ऑफ परतुर व सृष्टी फाउंडेशन तर्फे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रतिभा गोरे तहसीलदार यांच्या हस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांना पुढील यशस्वी ते साठी योग्य असे मार्गदर्शन तहसीलदार यांनी केले . खालापूर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आपले कर्तव्य करतच आपल्या पालकांनी केलेली कष्टातून मदत न विसरता यशस्वी होण्याचे वेगवेगळे मार्ग सांगितले . विद्यार्थ्यांनी व पालकांनी लायन्स क्लब व दृष्टी लॉयन्स नेत्रालयाचे अध्यक्ष खालापुरे यांचे आभार मानत दिलेल्या शुभेच्छा सार्थ करण्याची ग्वाही दिली.

यावेळी मनोहर खालापूरे संस्थापक अध्यक्ष रेवती राखे प्रमोद टेकाळे संजीवनी खालापुरे बबनराव उन्मुखे मधुकर भोसले मुकुंद शेपाळ डॉ. ज्ञानेश्वर शिंदे सर्व विद्यार्थी पालक उपस्थित होते.

## राज्याचे कौशल्य, रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा जालना दौऱ्यावर

**जालना -** राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे.

मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा हे गुरुवार, दि. २६ जुन, २०२५ रोजी सकाळी ११.१५ ते दुपारी १२.०० वाजता इंडस्ट्रीयल कॉन्क्लेव्ह इन्स्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई, मराठवाडा कॅम्पस, जालना येथे आगमन होणार आहे. तसेच दुपारी ३.०० ते ३.४५ वाजता कौशल्य विकास विभागाशी संबंधित जनसंवाद व जनता दरबारला उपस्थित राहतील. त्यानंतर दुपारी ४.०० ते ४.४५ जिल्हाधिकारी कार्यालय येथे कौशल्य विकास विभागाची आढावा बैठकीस उपस्थित राहतील.

संपादकीय पान

## पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा आज स्मृतिदिन. २० जून १९८७ रोजी डॉ सलीम अली यांचे निधन झाले होते. पक्षीतज्ज्ञ डॉ सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. डॉ सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन ष्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ त्यांनी इंग्लंडमध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली.ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २० जून १९८७ रोजी निधन झाले. डॉ सलीम अली यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पाऊले चालती पंढरीची वाट...

वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध गावांमधून निघून पंढरपूर येथे येणारी सामुदायिक विठ्ठल भक्तांची पदयात्रा. वारी ही महाराष्ट्रातील एक धार्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. ही वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळा होते.

वारी म्हणजे विठ्ठलाचे भक्तीचा लळा...
वारी म्हणजे वैष्णव भक्तांचा मेळा...
वारी म्हणजे आनंदाचा सोहळा...

वारीही महाराष्ट्रातील एक धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे. पायी केल्या जाणाऱ्या पंढरीच्या वारीची परंपरा ही बरीच जुनी आहे. तेराव्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. ज्ञानदेवांच्या काळात त्यांच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात होते, असा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या वारी सोहळ्यात सामील करून घेतले. संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज, यांनी सुद्धा वारीची परंपरा चालवली. ज्ञानदेवाच्या कर्तुत्वामुळे हा संप्रदाय प्रभावी ठरला. जे विठ्ठलाचे भक्त असती,ते येवोनी एक होती

गावोनी भगवत् भक्ती विठ्ठलाचे नाम घेत
उत्तम मार्गी चालती....

ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम,सोपानकाका, मुक्ताबाई, हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत होत.

शेतकरी मोठ्या प्रमाणावर असतात. कष्टकरी, महिला,असा सगळ्यांचा सहभाग वारीत असतो.गेल्या काही वर्षांपासून मोठ्या कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी, शालेय,महाविद्यालयीन विद्यार्थी,विद्यार्थिनी, निवृत्त जेष्ठ,यांचाही सहभाग दिसून येतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे मुलेही आता वारीत सहभागी होतात.

वारकरी संप्रदायात लहान-मोठा,गरिब-श्रीमंत,पुरुष-महिला हा भेदाभेद नाही.

एकमेकांना माऊली म्हणून संबोधतात. नमस्कार करतात.

तसेच नामजपाने पुण्य मिळते हा भाव आहे. एकादशी आणि इतर पवित्र दिवशी नित्यनेमाने पंढरपूरला जाणे म्हणजेच वारी होय. जो नियमित वारी करतो तो वारकरी. वारकरी जो धर्म पाळतात त्याला वारकरी धर्म असे म्हणतात. वारकरी धर्मालाच भागवत धर्म म्हटले जाते. पंढरी नगरीचा स्पर्श , चंद्रभागेत स्नान, आणि विठोबाचे,पांडुरंगाचे दर्शन या इच्छेपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी भागवत संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढीवारी ही प्रत्येक वारकरी महिलापुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बाळगून आहे असे मानले जाते.ती त्यांचेसाठी आनंदवारीच असते.त्यांचे मागणे एकच असते..

हेची दान देगा देवा...
तुझा विसर न व्हावा ...तुझा विसर न व्हावा ...

विष्णूंचा अवतार असलेल्या पांडुरंगाचे/विठ्ठलाचे हे सारेच भक्त असतात. आपले कर्तव्यकर्म निष्ठेने करीत असताना ते भगवंताचे विस्मरण होऊ देऊ नये यासाठी गळ्यात तुळशीची माळ घालतात. ह्या माळेचा जपमाळ म्हणून उपयोगाशिवाय, ती गळ्यात घातल्याशिवाय वारकरी होता येत नाही असे वारकरी पंथ सांगतो.

सात्त्विक आहार, सदाचारण, करावे. परोपकार आणि परमार्थही करावा. जीवनातील बंधनातून, मोहातून हळूहळू बाजूस होऊन पांडुरंगाशी एकरूप व्हावे, नामस्मरण करावे,असा साधा आणि उघड परमार्थ वारकरी संप्रदायाने सांगितला आहे. विठ्ठलाच्या दर्शनाने एक प्रकारची ऊर्जा मिळते. ती उर्जा- आनंद पुढील वारी पर्यंत वारकरी टिकवतो.

वारकरी धर्मात कोणत्याही कार्याची सुरुवात करताना पुंडलिक वरदा हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम पंढरीनाथ महाराज की जय! असा जयघोष केला जातो. स्थानपरत्वे या जयघोषात पंढरीनाथ भगवान की जय असा वेगळे पणा आढळतो. अनेक ठिकाणी माउली ज्ञानेश्वर महाराजकी जय , जगद्गुरु



तुकाराम महाराजकी जय, शान्तिब्रह्म एकनाथ महाराज की जय अशी विविधता आढळते. या जयघोषाला वारकरी महावाक्य किंवा वारकरी महाघोष म्हटले जाते.

वारीत अभंग,ओव्या, भारुड,हरीपाठ,ज्ञानेश्वरी,हे सगळे येत.जो तो आपल्याच नादात असतो.

वारीसाठी भक्तांना वाहनांची सुविधा देण्यात येते. यासाठी शासकीय स्तरावर योजना राबविल्या जातात..दिंड्यांना शासनाने विसहजार अनुदान ही जाहीर केले आहे। जादा बसेसही सोडण्यात येतात. मार्गाची पाहणी करणे, रस्त्यांची स्वछता, वैद्यकीय सेवा, पिण्याचे पाणी यांची व्यवस्था महाराष्ट्र शासनातर्फेकेली जाते.

पंढरपूरला जात असलेल्या वारक-यांची सेवा करण्याची संधी समाजाच्या विविध स्तरातून स्वेच्छेने घेतली जाते. काही मंडळी वैयक्तिक किंवा कौटुंबिक स्तरावर अशी सेवा पुरवितात. ज्यामध्ये वारीच्या मार्गावर उभे राहून वारक-यांना खाद्यपदार्थ पुरविणे, पाण्याची व्यवस्था, कपडे, रेनकोट देणे अशी सेवा केली जाते. सामाजिक संस्था, औद्योगिक संस्था या सुद्धा वारक-यांना विविध सुविधा पुरवितात. यामध्ये त्यांची सेवा करणे असा भाव असतो. काही वैद्यकीय संस्था आणि रुग्णालये वारकरी भक्तांच्या शारीरिक चाचणी, उपचार यांची काळजी घेतात.

महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून ठिकठिकाणाहून लाखो भाविक लोक विठ्ठल नामाचा गजर करीत आषाढी एकाद्शीला पायी चालत येतात.हिलाच आषाढी वारी म्हणतात. चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेतात. आषाढीला या दिवशी शेगाव येथून श्री संत गजानन महाराजांची पालखी, आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूहून तुकारामांची, त्रंबकेश्वरहून निवृत्तीनाथांची, पैठणहून एकनाथांची,मुक्ताईनगरहून संत मुक्ताबाईची पालखी पंढरपूरला येते.सोपानदेवांची पालखी सासवड येथून येते.

उत्तर भारतातून कबिराची पालखी येते. हजाराने दिंड्या पंढरपूरच्या वाटेने पांडुरंगाचा जयघोष करत मार्गस्थ असतात.

आषाढ महिन्यातील (जून-जुलै) शुक्ल/शुद्ध पक्षातील अकरावी तिथी ही प्रथमा एकादशी / महा एकादशी / देव-शयनी एकादशी म्हणून ओळखली जाते. हा मोठा पवित्र दिवस आहे. या दिवशी उपवास केला जातो. या दिवसापासून चातुर्मास (चार महिन्यांचा काळ) सुरू होतो, तो कार्तिकी एकादशीला संपतो. अशी मान्यता आहे की या दिवशी भगवान विष्णू हे, क्षीरसागरात शेषनागावर, योगनिद्रेस जातात आणि योगनिद्रेतून बाहेर येतात ते कार्तिकी एकादशीला (प्रबोधिनी एकादशी) या काळात मांसाहार वर्ज्य केला जातो.

ह्या काळात जमेल ते चातुर्मासात नियम करतात. (जप,पोथीवाचन,आदी)

पंढरपुराला उत्तरेकडे तीन व दक्षिण व पश्चिमेकडे प्रत्येकी एक द्वार आहे. महाद्वार पूर्वेकडे असून, ज्या अकरा पायर्या चढून गेल्यावर ते लागते त्यांतील एका पायरीला 'नामदेवाची पायरी' म्हणतात.

विठ्ठलाला तुळस आणि मंजिरीचा हार वाहतात.

तुळस श्रीलक्ष्मीचे प्रतीक आहे व श्रीलक्ष्मी ही श्रीविष्णूची पत्नी असल्यामुळे (श्री विठ्ठल हा श्रीविष्णूचे रूप आहे.) ती तुळशीच्या माध्यमातून श्रीहरी चरणी राहते. तर वारकरी स्वतः तुळशीच्या वाळलेल्या काड्या जाळून त्यात,कापूर, चांगले तुपापासून बनवलेला बुक्का लावतो.ह्या बुक्क्याला फार महत्व आहे.बुक्का, तुळशीची माळ हे आवश्यक आहे.अर्थातच हे विठ्ठलाचे, पांडुरंगाचे भक्तिचे प्रतिकच आहे.

वारीच्या दरम्यान होणारे रिंगण हे वारीचे वैशिष्ट्य मानले जाते. कडूस फाटा,वेळापूर आणि वाखरी येथे रिंगण होते. रिंगण ही एक पवित्र आणि श्रद्ध्येय संकल्पना आहे. मोकळ्या मैदानात वारकरी परस्परांचे हात धरून गोलाकार उभे राहतात. यातील मोकळ्या जागेतून ज्ञानेश्वर महाराजांचा घोडा धावतो. याला आदराने माऊलीचा अश्व असे म्हणतात. या अश्वावर स्वतः ज्ञानेश्वर महाराज आरूढ होतात अशी वारकरी संप्रदायात धारणा आहे.

धावा म्हणजे धावणे. असे मानले जाते की पंढरपूरला पायी जात असताना संत तुकाराम महाराज यांना वेळापूर येथील छोटयाशा टेकडीवरून विठ्ठलाच्या देवळाच्या कळसाचे दर्शन झाले आणि विठ्ठलाच्या दर्शन ओढीने ते तिथून पंढरपूरपर्यंत धावत गेले. याचे स्मरण म्हणून वारकरी वेळापूरपासून पंढरपूरपर्यंत शेवटचा टप्पा धावत जातात.

आषाढी एकादशीच्या पहाटे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सपत्नीक श्री विठ्ठल आणि रुक्मिणीची महापूजा करतात. याला शासकीय पूजेचा दर्जा दिलेला आहे. त्यांच्या बरोबरच वारकरी समुदायातील एका दाम्पत्याला प्रतिवर्षी पूजेचा मान मिळतो. असा मान मिळणे वारकरी संप्रदायात आदराचे समजले जाते.

संत साहित्याचे अभ्यासक डॉक्टर रामचंद्र देखणे म्हणतात वारी हा भगवत भक्तीचा नुसता अविष्कार नसून भक्ती प्रेमाची अनुभूती घेण्याची ती सहज स्थिती आहे. परब्रम्हला साठवीत साठवीत विवेकाच्या दिशेने होणारी उन्मत्त वाटचाल म्हणजे पंढरीची वारी. मानवी जीवनात परिवर्तनाच्या दिशेने पडणारे विवेकी पाऊल म्हणजे वारी. बहुतेक क्रियांमध्ये साधन खडतर असते तर साध्य आनंद रूप असते. वारीच्या वाटचालीत साधन आणि साध्य दोन्ही आनंद रूपच. ज्ञानरूप परमात्मा हे साध्य तर भक्ती वाटचाल हे साधन आहे.

प्रत्येक भक्ताला, वारकऱ्याला आषाढी एकादशीला पांडुरंगाचे दर्शन होणारच. कारण तो प्रत्येकाचे मनामनात आहे.

खूप मोठ्या संख्येने वारकरी ह्या आनंदवारीत सहभागी झालेले आहेत.



आता वारकऱ्यांची पाऊले चालली आहे पंढरीच्या वाटेने... जय जय रामकृष्ण हरि...
विठ्ठल.... विठ्ठल... जय हरी विठ्ठल.

**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा. ८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

## दीनदयाल उपाध्याय हिरकमहोत्सव समितीवर संजय अग्रवाल यांची नियुक्ती

# दानकुंवर महिला महाविद्यालयात सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** पंडित दीनदयाल उपाध्याय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सववाच्या जिल्हास्तरीय समितीवर अशासकीय सदस्य म्हणून जालना येथील श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालय समितीचे कोषाध्यक्ष संजय अग्रवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या पत्रानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे कार्य, विचार प्रणाली, एकात्म मानव दर्शन शालेय विद्यार्थी, शिक्षक, महिला, शेतकरी, कामगार, अध्यात्मिक क्षेत्रातील महत्त्वाच्या व्यक्तीपर्यंत पर्यंत पोहचवण्यासाठी एक लाख पुस्तकाची निर्मिती करणे, शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करणे आदी उपक्रम समितीच्या माध्यमातून राबविले जाणार आहेत. राज्यस्तरीय समितीच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय समिती कार्यरत राहणार आहेत. राज्य शासनाच्या महत्वाच्या समितीवर संजय अग्रवाल यांची नियुक्ती झाल्याबद्दल गुरुवारी श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालयाच्या वतीने त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष महेंद्र गुप्ता, संचालक विनोद अग्रवाल, राजेंद्र गुप्ता, अजय गुप्ता, नीरज गुप्ता, प्रशासकीय अधिकारी डॉ विद्या पटवारी, प्राचार्य डॉ.एस. डी.तळेकर, आदींची प्रमुख उपस्थिती होती. तसेच उपाध्यक्ष गणेश अग्रवाल, सचिव मुकेश अग्रवाल, सहसचिव नरेश अग्रवाल, संचालक राजेश अग्रवाल, सुरेद्र अग्रवाल, जितेंद्र गुप्ता, जगदीशप्रसाद अग्रवाल, महावीरप्रसाद अग्रवाल, रवींद्र अग्रवाल, राहुल गुप्ता, पंकज गुप्ता, अंकित अग्रवाल,सागर अग्रवाल, सुरेश लाहोटी, गायत्री शुक्ला आदींनी संजय अग्रवाल यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन केले आहे. या प्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




पान १ वरुन

## शासकीय योजनांच्या ...

यांच्या समवेत विविध उपक्रम राबवले.

या यात्रेचा उद्देश केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा प्रचार करणे आहे, ज्यात पर्यावरण व वन्यजीव संरक्षण, प्रदूषण नियंत्रण, पर्वत व नदी संरक्षण, बेटी बचाओ - बेटी पढाओ, रस्ते सुरक्षे संदर्भातील जनजागृती, जनसंवर्धन, स्वच्छ भारत मिशन अशा अनेक योजनांचा समावेश आहे. या यात्रे अंतर्गत शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती व सार्वजनिक ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष भेटी, व्याख्याने व जनजागृती कार्यक्रम राबविले जात असल्याची माहिती जितेंद्र प्रताप यांनी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांना दिली.

## शासन निर्णयाची...

यांनी यावेळी दिला.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष रवी राऊत, जिल्हा उपाध्यक्ष शरद मांगदरे, शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे, विलास तिकांडे, गणेश देवडे, योगेश कदम,वैभव साळे, महेश नागवे, विवेक वैद्य, गोरगआप्पा पुंगुडवाल, चक्रधर दंडाईत, बाळासाहेब काळे, यश गिरी, दीपक गिरी, भागवत निकम, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने ऊपस्थिती होती.

## इनरव्हील होरायझन ...

आशेचा नवा किरण, स्वावलंबनाचा पाया आहेत, असे त्या म्हणाल्या. उपकरणे देण्यापूर्वी प्रत्येक मुलाची वैद्यकीय तपासणी करण्यात येऊन संबंधित तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानेच योग्य उपकरणांची निवड केली गेली.

आपल्या भावना व्यक्त पालकांनी सांगितले की, या साधनांमुळे माझं मूल आता स्वतः उठू , चालू आणि शाळेत जाऊ शकेल, याहून मोठं समाधान आमच्यासाठी नाही. ही मदत आमच्यासाठी केवळ उपकरणांची नाही, तर ही आमच्या मुलासाठी स्वप्नपूर्ती आहे.

# परतूरच्या कन्या विद्यालयात विद्यार्थीनींचे औक्षण करून स्वागत

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील लालबहादूर शास्त्री कन्या विद्यालयात आज शाळेचा पहिला दिवस असल्यामुळे विध्यार्थीनीचे आगळे वेगळे स्वागत करण्यात आले.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

शाळेला सुरुवात होण्याचा पहिला दिवस होता.शाळेत रांगोळी काढून येणाऱ्या विद्यार्थीनीं चे औक्षण आणि गुलाबाचे फुले देऊन स्वागत करण्यात आले. तसेच मुलींना वर्ग ५ वी ते ८वी पर्यंत पुस्तके वाटप करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शाळेतील शिक्षक शाम काबाडी, योगेश बरीदे, राम प्रसाद नवल, सचिन कांगणे, सुरेश मसलकर, अनिल काळे, बळीराम नवल,श्रीमती वृंदा डख, श्रीमती स्वरा मॅडम आदी शिक्षकेतरं कर्मचारीआणि विद्यार्थी उपस्थिती होते.



# मोठ्या राड्यानंतर नूतन वसाहत मधील मोकळ्या जागेवरील नगरपालिकेने अतिक्रमण हटवले; ४ जणांना पोलिसांनी घेतलं ताब्यात

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नूतन वसाहत भागात महापालिकेच्या मोकळ्या जागेवर करण्यात आलेलं अतिक्रमण अखेर हटवण्यात आलं आहे.आज दि.१९ गुरुवार रोजी दुपारी ३ वा. च्या सुमारापासून पोलीस बंदोबस्तात महापालिकेचं अतिक्रमण हटाव पथक, आणि पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केली आहे.मात्र हे अतिक्रमण हटवताना मोठा राडा झाला. ज्यावेळी महापालिकेचं पथक अतिक्रमण हटवण्यासाठी नूतन वसाहत भागात गेलं त्यावेळी अतिक्रमण धारकांनी मोकळ्या जागेच्या भोवती वाल कंपाऊंड केलेलं होत. ते वाल कंपाउंड पाडण्यास अतिक्रमण धारकांनी विरोध केला.त्यांनतर महापालिका पथकाने पोलिसांना बोलावून घेतलं यावेळी पोलीस आणि अतिक्रमण धारक यांच्यात देखील बाचाबाची झाली. अखेर पोलीस आल्यानंतर महापालिकेच्या पथकाने जेसीबी पुढे चालवला आणि अतिक्रमण तोडण्यास सुरुवात केली .यावेळी हुज्जत आणि हाणामारीवर आलेल्या ४ अतिक्रमण धारकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.दरम्यान अतिक्रमण हटवण्यात आलं असून अतिक्रमणाची तक्रार करणाऱ्या आणि अतिक्रमण धारकांमध्ये मारहाण झाली.त्यानंतर कदीम जालना पोलिसांनी ४ जणांना ताब्यात घेतलं .याप्रकरणी कदीम जालना पोलीस पुढील कारवाई करत आहे.



सदरील जागेचा वाद न्यायालयामध्ये चालू असून महापालिकेने आपणास अगोदर नोटीस द्यायला हवी होती. परंतु नोटीस न देता कंपाउंड वॉल पाडण्यात येत असल्याचा आरोप अतिक्रमण धारकाने केला. तर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी अतिक्रमण धारकास सांगितले की मा. न्यायालयाचे कोणते पेपर आपल्याकडे आहे ते दाखवा सदरील जागा ही महानगरपालिकेची असून आपण त्यावर बेकायदेशीर कब्जा केलेला असल्याचे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे होते. या बाचाबाची मध्ये तब्बल चार तास उलटले आणि या चार तासांमध्ये बराच गोंधळ आणि राडा झाला. शेवटी पोलिसांनी अतिक्रमण धारकांना ताब्यात घेऊन महापालिकेने जेसीबीच्या साह्याने संपूर्ण वॉल कंपाऊंड जमीनदोस्त केले.

# शिवसेनेचा वर्धापन दिन जल्लोषात साजरा

## जाफराबाद येथे ज्येष्ठ शिवसैनिकांचा केला सत्कार



**जाफराबाद । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज बाजार समितीच्या आवारात सेवन स्काय मल्टिपल येथे शिवसेनेचा ५९ वार वर्धापन दिन जल्लोषात साजरा करण्यात आला.

यावेळी ज्यांनी या १९ जून १९६६ मध्ये शिवसेनेचे रोपटे लावले, व आज त्याचा वटवृक्ष बघायला मिळत आहे, हिंदुहरदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जय भवानी जय शिवराय,शिवसेना प्रमुख बाळासाहेब तुम अमर रहे, पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचा विजय असो अशा विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला.तर यावेळी तालुक्यातील ज्येष्ठ शिवसैनिक तथा सत्कारमूर्ती बाबुराव पा. सवडे, संपतराव जंजाळ, दादाराव पा.सरोदे बाबुराव पा.मुळे, विष्णू पा.म्हस्के, दगडोबा मोकळे, दामू अण्णा उबाळे,यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाला शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख रमेश गव्हाड, माजी जि.प.अध्यक्ष उत्तमराव वानखेडे, माजी सभापती रमेश धावलिया, तालुका प्रमुख कुंडलिक मुठ्ठे, शहर प्रमुख देवीसिंह बायस, मोहम्मद फैसल, विष्णू पा. लोखंडे, विठ्ठल पा.खपुटे, परमेश्वर पा. सरोदे, परमेश्वर जाधव, समाधान पा.सवडे, समाधान पा. चव्हाण. गजानन खंबाट, अमोल म्हस्के ,गोविंदा माकोडे, समीर शहा, शेख इरफान, शेख सलमान, केशव दळवी, संतोष रगड, राजू लोखंडे, नंदू गायकवाड, दिगंबर जाधव, गोविंदा गाढे, जनार्दन झोरे, बाळासाहेब देशमुख, पवन मस्के ,जनार्दन जंजाळ, यांच्यासह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# सायकल वारीचे १९ जूनला पंढरपूरला प्रस्थान

**विशाल देशमुख**
**जाफराबाद -**
दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भोकरदन जाफराबाद सायकल संघटना यांची सायकलवारी भोकरदन पासून ते पंढरपूर ३६० किलोमीटर सायकलवर प्रवास करून पंढरपूर गाठून पांडुरंगाच्या चरणी लिन होणार आहेत.

भोकरदन ते पंढरपूर सायकल वारी चे हे तिसरे वर्ष असून यामध्ये टेंभुर्णी,जाफराबाद,वडाळा, ताडकळस,सिपोरा, माहोरा,विरेगाव भोकरदन व बरंजळा साबळे येथील सायकलिस्ट सहभागी होणार आहेत यामध्ये काही डॉक्टर्स वकील शिक्षक इतर कर्मचारी वृंद यांचा समावेश आहे.

दरवर्षी आषाढी एकादशीला जसे वारकरी पायी दिंडी करतात तसेच पद्धतीने गेल्या तीन वर्षापासून भोकरदन जाफराबाद सायकल संघटना यांची सायकलवारी पंढरपूरला रवाना होत असते.

यंदाही सायकलवारी १९ जून २०२५ भोकरदन येथून सकाळी पाच वाजता विठुरायाच्या पंढरपूर वारीसाठी रवाना .


तीन दिवसांमध्ये सायकल वारकरी एकूण ३६० किलोमीटरचा प्रवास करणार आहेत. रोज १२० किलोमीटर प्रमाणे तीन दिवसात पंढरपूर येथे पोहोचणार आहेत. पहिला मुक्काम गेवराई,दुसरा मुक्काम बार्शी आणि तिसरा मुक्काम पंढरपूर. अशा पद्धतीने प्रवास करणार आहेत

यात भोकरदन-जाफराबाद सायकल संघटनेचे अध्यक्ष श्री पंडित एकनाथ सुरशे (टेंभूर्णी), उपाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर थोरात, सचिव लक्ष्मण सुरडकर, सहसचिव डॉ राजेश कड, कोषाध्यक्ष डॉ राहुल चौधरी, डॉ संदीपान साबळे, संजय मिरकर, निलेश सुरशे, राम जैन, अनिल पिसे, राहुल म्हस्के, ऋषिकेश देशपांडे, उमेश शिरसाठ, नवनाथ खेकाळे व इतर सायकलिस्ट असे एकूण जवळपास वीस सायकलिस्ट पंढरपूर साठी रवाना होत आहे. चौकट ::- पंढरीच्या विठुरायाला भेटण्यासाठी, नवीन उपक्रम म्हणून तीन वर्षापासून सायकलवारी भोकरदनच्या प्रभात तालुक्यातील सायकल संघटनेने उपक्रम राबवीत आहे. पाई वारी, एसटीने वारी, रेल्वेनेवारी, पण या सर्व मंडळींनी सायकलवारी काढण्याचा विचार सुरू केला आणि तो तीन वर्षापासून सतत सुरू आहे. भक्तिमय वातावरणामध्ये ह्या सायकलवारीचा पंढरपूर नगरीकडे रवाना झाली आहे. हस्तुत्य उपक्रम सर्वांनाच भावून टाकत आहे. पायी दिंडी वारी प्रमाणेच सायकल दिंडी वारी ही नवीन उपक्रमाची कौतुक लोकांमध्ये आहे. आधुनिक जगामध्ये अशा पद्धतीचा उपक्रम राबवणाऱ्या या मंडळीला धन्यवाद देण्यात येत आहे.



# श्रीमंताचीच मुले व्यसनी निघतात!

आजकाल व्यसनाचे प्रमाण खूप वाढले आहे. विशेष करून श्रीमंत बापाच्या श्रीमंत औलादी व्यसन करण्यात फार पुढे गेल्या आहेत. ढाब्यावर किंवा बारवर गेल्यास असे निदर्शनास येते की, तिथे गरीब घरातील पिणारे युवक कमी प्रमाणात आणि श्रीमंत घरातील पिणारे युवक अधिक प्रमाणात पाहायला मिळतात. संध्याकाळ झाली की, गावातील पिणारे युवक एकत्र येतात आणि ढाब्यावर जाऊन मनसोक्त पार्टी करतात. हजारो रुपये दारू व मटक्यावर उधळतात. स्वतःच्या मर्जीप्रमाणे चैन विलासात मनमानी व चंगळवादी जीवन जगतात. काही काही श्रीमंत बापाच्या श्रीमंत औलादी तर फार पुढच्या थराला गेलेल्या असतात. डान्स बारमध्ये जाऊन तरुण मुली किंवा बाया नाचवतात, आपणही फुल दारू पिऊन त्यांच्यासोबत डान्स करतात अन् हजारो रुपये त्या नाच्यांवर उधळतात. या युवकांचा असाच रोजचा दिनक्रम ठरलेला असतो. या युवकांच्या बापाने मात्र अतिशय चिकाटीने व स्वतःच्या पोटाला चिमटा देऊन आणि दुसऱ्यांना फसवून किंवा दुसऱ्यांचा पैसा लुबाडून अमाप पैसा व संपत्ती गोळा केलेली असते. आणि श्रीमंत म्हटले जाणारे हे लोक फार चिकाटीचे व कंजूष असतात. त्यांच्या हातातील पैसा सहजासहजी तर सुटतच नाही. ते नेहमी पैसा पैसा करतात.आणि पैशाच्या मागे सुसाट वेगाने धावतात. त्यांना दानधर्म करायला आवडत नाही. ते दारावर आलेल्या भिकाऱ्याला रिकाम्या हाताने परत करतात. अडचणीत सापडलेल्या नातेवाईकांना किंवा समाज बांधवांना आर्थिक मदत करायला त्यांना नको वाटते. मी काही असेही श्रीमंत माणसे पाहिले आहेत की, ते गटारात पडलेला एक रुपया हाताने काढून घेतात आणि खुशाल खिशात टाकतात. त्यांना कशाची लाज वाटत नाही ना कशाची लज्जा! खूप निसाक असतात हो हे श्रीमंत लोक आणि पैशाला तर खूपच हापापलेले असतात. त्यांच्या डोक्यात सारखे पैशाचे वेड असते. हे लोक मरायला टेकले तरी पैसा पैसा करायचे सोडत नाहीत. या श्रीमंतांना पैशाशिवाय दुसरे काही सुचतच नाही. या नादात आपली सामाजिक प्रतिष्ठा कमी होत आहे, याचे देखील त्यांना भान राहत नाही.हे यावरून स्पष्ट होते. या श्रीमंत लोकांना असे वाटत असते की, आपल्या मुलाने किंवा मुलीने लव्ह मॅरेज किंवा कोर्ट मॅरेज करावे म्हणजे लग्नाला खर्च होणारा पैसा वाचेल. म्हणजे या श्रीमंतांना ना कसली इज्जत ना कसली प्रतिष्ठा फक्त स्वतःचा स्वार्थ साधने हेच त्यांचे उद्दिष्ट. दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ही श्रीमंत माणसे शासकीय योजनांचा लाभ घेण्यात सगळ्यांच्या पुढे असतात. सरकारी दवाखान्यात सुद्धा गरिबांपेक्षा श्रीमंत माणसेच मोफत औषधोपचारांचा लाभ घेताना रांगेत दिसतात. या श्रीमंतांची गर्दी पाहून गरीब रुग्ण खाजगी दवाखान्यात उपचार घेण्यासाठी जातात. ही श्रीमंत माणसे जेवढा पैसा बचत करता येईल तेवढा बचत करण्याचा प्रयत्न करतात. मग अशा श्रीमंतांना समाजात व गावात कोण किंमत देईल. त्यांच्यात लोकांना दानधर्म करण्याची दानत नाही आणि गरजवंताला सढळ हाताने आर्थिक मदत करण्याची भावना नाही तर मग अशा माणसांच्या पैशाला व संपत्तीला काय जाळायचे आहे? यापेक्षा शेतात काबाडकष्ट करून पोट भरणारी माणसे यांच्यापेक्षा बरे म्हणावे लागतील. ते पैशापेक्षा माणुसकीला आणि माणसाला जास्त महत्त्व देतात. मानवता हाच धर्म पाळून गरजवंताला सढळ हाताने आर्थिक मदत करतात. दारावर आलेल्या भिकाऱ्याला दानधर्म करण्याची त्यांच्यात दानत असते. आपल्या मुलांचे लग्न धुमधडाक्यात लावून गाव जेवण देण्याची त्यांच्यात धमक असते. म्हणूनच त्यांच्या पोटाला चांगली व गुणवान संतती निर्माण होते. पण दुसऱ्यांची घरे उध्वस्त करून पैसा व संपत्ती मिळवणाऱ्या बापाच्या पोटाला संतती कशी काय चांगली निपजणार? त्यांच्या पोटाला तर संतती व्यसनी व दारुडीच निघणार आणि बापाने दुसऱ्यांना फसवून हडप केलेली संपत्ती ही मुले दारू आणि मटक्यावरच उधळणार! एवढे मात्र नक्की आहे.. ज्या मुलाचे आई वडील अहोरात्र काबाडकष्ट करून व शेतात घाम गाळून भरपूर पैसा व संपत्ती कमावतात त्या दांपत्याच्या पोटी मुले सुद्धा निर्व्यसनी व चांगली निघतात. बापाने कमावलेला पैसा चांगल्या कार्यासाठी लावतात. कारण निसर्गाचा नियमच आहे की, ज्याने चांगल्या मार्गाने पैसा कमावला त्याची मुले चांगलीच निघतात आणि ज्याने वाईट मार्गाने व दुसऱ्यांना लुबाडून हरामीचा पैसा कमावला त्याच्या पोटाला मुले व्यसनी व दारुडे निघतात. आणि सगळा पैसा दारूवर आणि पोरीवर उधळतात. आपण समाजात पाहतोय की, ज्या बापाने दुसऱ्यांना फसवून वाईट मार्गाने पैसा कमावलेला असतो त्या बापाची मुले व्यसनी, दारुडे व उडवे निघतात आणि बापाने पापाने कमावलेला पैसा पाण्यात घालतात. पण जे आईवडील शेतात खूप खूप काबाडकष्ट करतात, जिवापाड मेहनत करतात त्या दांपत्याच्या पोटी खरोखरच गुणवान व शीलवान मुले जन्माला येतात. आपल्या आई वडिलांचा जीवन संघर्ष डोळ्यासमोर ठेवून खूप खूप अभ्यास करतात. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवतात. आई-वडिलांनी पाठवलेला पैसा काटकसरीने वापरतात आणि हीच मुले भविष्यात उच्च पदावर विराजमान होतात. ही वस्तुस्थिती आहे. हल्ली जर समाजात, गावात व कुठेही पाहिले तर असे दिसून येईल की, प्रत्येक श्रीमंत बापाच्या पोटाला व्यसनी व दारुडे मुले आल्याचे समजते. त्यांनी दारू व मटक्यात बापाचा पैसा बरबाद करून करोडपती बापाला काही दिवसातच भिकारपती बनवल्याचे अनेक उदाहरणे आपण डोळ्यांनी पाहिले आहेत. हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. या श्रीमंतांकडे जो पैसा असतो तो काय त्यांनी इमानदारीने व कष्टाने घाम गाळून थोडाच कमावलेला असतो. या श्रीमंतांनी कित्येक लोकांचा तळतळाट खाऊन आणि कित्येक लोकांची घरे उध्वस्त करून हा पैसा कमावलेला असतो. मग हा वाईट मार्गाने कमावलेला पैसा कसा काय टिकेल? जैसी करनी वैसी भरणी या म्हणी प्रमाणे दुसऱ्यांना लुबाडून कमावलेला पैसा हा कुठेतरी फेडावाच लागतो. म्हणून आपल्या पोटाला निसर्गाने मुद्दाम व्यसनी व दारुडे मुले पाठवून दिलेली असतात. बापाने वाईट मार्गाने कमावलेला पैसा व संपत्ती ही दारुडे मुले दारू व मटक्यावर उधळतात. बापाला मात्र एक दिवस कंगाल करून सोडतात. इतके दिवस यांनी लोकांची घरे उध्वस्त केलेली असतात आणि आता त्यांचाच मुलगा दारू व मटक्यात त्यांचे घर स्वतःच्या हाताने उध्वस्त करून टाकतो. यालाच म्हणतात जसे करावे तसे भरावे... आपण दुसऱ्यांचे चांगले केले तर आपले चांगले होते. म्हणतात ना कर भला सो हो भला... हे काय उगीच म्हटले नाही. म्हणून माझी सर्वांना कळकळीची नम्र विनंती आहे की, बांधवांनो कधीच दुसऱ्यांना लुबाडून किंवा फसवून पैसा मिळवू नका... दुसऱ्यांची घरे बरबाद करून मिळवलेला पैसा फार काळ टिकू शकत नाही. तो कसा संपून जाईल हे तुम्हाला पण कळणार नाही. तुम्ही असाल करोडपती पण तुम्हाला एक दिवस भिकारपती केल्याशिवाय राहणार नाही...म्हणून पैसा हा घाम गाळून कष्टाने व इमानदारीने कमवा... हरामीने कमावलेल्या लाख रुपयापेक्षा कष्टाने कमावलेले पन्नास हजारच आपल्याला खूप महत्त्वाचे आहेत... आपल्या मुलांना एवढी पण संपत्ती कमावून ठेवू नका की, मुले व्यसनी, आळशी व बिनकामी निघतील...फक्त एवढेच करा की, आपल्या मुलांना उच्चशिक्षण शिकण्याएवढा मुबलक पैसा साठवून ठेवा... शिल्लक पैसा अनाथाश्रमांना व वृद्धाश्रमांना दान करा... त्या पैशाचे गावात एखादे वाचनालय सुरू करा... गोरगरिबांच्या मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावा... बौद्ध विहारे, मंदिरे किंवा जिम खाना बांधण्यासाठी पैसा सत्कारणी लावा... तुमची मुले आपोआप नंतर स्वतःच्या पायावर उभे राहतील... आणि भरपूर पैसा व संपत्ती कमावतील आणि तुमचाच आदर्श घेऊन समाज कार्य करत राहतील....



**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** पंतप्रधान महोदयांनी सन २०१४ च्या राष्ट्रीय महासभेत दि.२१ जुन हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणुन दरवर्षी साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे. दि. २१ जुन २०२५ रोजी जागतिक योग दिन दिनाचे औचित्य साधुन संपुर्ण राज्यभर सामुहिक योग शिबीर प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात येत आहे. जिल्ह्यातील मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हा प्रशासन, जिल्हास्तर योग समिती, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक) जिल्हा परिषद, जालना, क्रीडा भारती, जिल्हा योग संघटना जालना, आयुष विभाग जालना, जिल्हा युवा अधिकारी, नेहरू युवा केंद्र, विविध योग संघटना, जिल्हा स्काऊट गाईड, तंत्र निकेतन महाविद्यालय व जिल्हा एकविध क्रीडा संघटना, विविध क्रीडा मंडळे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जुन २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे सामुहिक योगा व प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर योग प्रात्यक्षिकासाठी येताना पांढरा सुटसुटीत ड्रेस असावा, सोबत मॅट/सतरंजी, पाणी बॉटल व नॅपकीन असावा. दि. २१ जुन २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे सामुहिक योगा व प्रात्यक्षिकासाठी जिल्हयातील जास्तीत जास्त अधिकारी कर्मचारी, खेळाडू, क्रीडा संघटक, क्रीडा प्रेमी, युवक युवती यांनी सहभागी व्हावे असे आवाहन संजय गाढवे, जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी श्री. सिध्दार्थ कदम क्रीडा मार्गदर्शक, मो.नं.८९७५३३३५९४, श्री. आशिष जोगदंड क्रीडा मार्गदर्शक, मो.नं.८८८८३४६८२८, श्रीमती लता लोंढे, क्रीडा अधिकारी मो.नं.९८५०३३३३२६ श्रीमती आरती चिल्लारे, क्रीडा अधिकारी मो.नं.७७५८८६३९९१ यांना संपर्क साधावा.

# रजनीबाई सुरेशचंद्र लोखंडे यांचे निधन



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नुतन वसाहत येथील रहिवाशी रजनीबाई सुरेशचंद्र लोखंडे यांचे (दि. १९) जुन सकाळी १० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे (वय ८५) वर्ष होते. अनेक वर्षे त्यानी भोकरदन तालुक्यातील अनेक गावातील शासकीय रुग्णालयात आरोग्य पर्यवेक्षक म्हणुन काम केले होते. त्यांच्या जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ होता. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे, पणतू असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर नवीन जालना परिसरातील शांतीचा मार्ग ख्रिश्चन स्मशान भुमीत दुपारी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी समाजातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# शेकडो वर्षांची वारी परंपरा ही चंद्र सूर्य असेपर्यंत कायम राहील - आ. लोणीकर

मंठा । प्रतिनिधी - दुर्लभ साधनेने साधारण मनुष्यही देवत्व प्राप्त करू शकतो, हे वारीतून कळते. वारी पायी केली तर शारीरिक तप घडते, सर्व पाप नष्ट होतात म्हणूनच अत्यंत मनोभावे हे आषाढी एकादशीची वारी केली जाते. जोपर्यंत चंद्र सूर्य आहेत तोपर्यंत संत परंपरेने सुरू केलेली शेकडो वर्षांची ही वारी परंपरा यापुढे अशीच कायम राहील. केवळ विठ्ठल दर्शनाची आस मनामध्ये ठेवून 'पंढरीचा वास, चंद्रभागेस्नान, आणिक दर्शन विठोबाचे' या इच्छेपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी वारकरी संप्रदायाची धारणा आहे. त्यामुळेच आषाढी वारी ही प्रत्येक वारकरी महिलापुरुषांच्या मनात आदराचे आणि श्रद्धेचे स्थान बनली आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

मंठा तालुक्यातील श्रीक्षेत्र निळकंठेश्वर येथून पंढरपूर कडे प्रस्थान करणाऱ्या दिंडीमध्ये पायी चालत माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर सहभागी झाले. यावेळी १००८ महामंडलेश्वर स्वामी श्रीकृष्ण चैतन्यजी महाराज, महंत नर्मदापुरीजी महाराज, महंत परमानंद पुरीजी, महाराज महंत रमणचैतन्य पुरीजी महाराज, महंत विठ्ठलगिरिजी महाराज महंत स्वरूपानंद सरस्वती महाराज, महंत प्रणवचैतन्य पुरीजी महाराज आचार्य स्वामी जनार्दन जी शास्त्री हभप जगन्नाथ महाराज गनगे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा असणारा शेगाव ते पंढरपूर २ हजार कोटी रुपयांचा दिंडी मार्ग वारकऱ्यांसाठी निर्माण करण्यात मला हातभार लावता आला याचा मला सार्थ अभिमान आहे. परतुर विधानसभा मतदारसंघात २०० गावांमध्ये ३०० सभामंडप गावातील मंदिरांसमोर उभारण्याचे भाग्य मला लाभलं आहे. आणि अजूनही ज्या गावात नव्याने मंदिर उभारले जाईल त्या ठिकाणी सभामंडप देण्यासाठी मी लोकप्रतिनिधी म्हणून कटिबद्ध आहे.

महाराष्ट्र राज्यातील किर्तनकार व वारकऱ्यांना सोयी-सुविधा पुरविण्याकरिता व कल्याणकारी योजना राबविण्याकरीता तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व तत्कालीनउपमुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्यास दि. १४ जुलै २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मुख्यमंत्री वारकरी महामंडळाचे मुख्यालय पंढरपूर येथे राहणार असून महामंडळावर कार्यरत किंवा सेवानिवृत्त भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.महामंडळासाठी भाग भांडवल म्हणून ५० कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आली आहे. सर्व तिर्थक्षेत्रांचा विकास, किर्तनकार व वारकऱ्यांना अन्न, निवारा, सुरक्षा, वैद्यकीय मदत, विमा कवच, पायाभूत सुविधा इ. सोयी-सुविधा पुरविण्याकरिता व कल्याणकारी योजना राबविण्याकरीता मुख्यमंत्री वारकरी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

वारीची परंपरा ही ८०० वर्षांपेक्षाही अधिक जुनी आहे. महाराष्ट्रातील विविध गावांमधून तसंच अगदी कानाकोपऱ्यातून लाखो भाविक विठ्ठलनामाचा गजर करत ही परंपरा आजही जपत आहेत. सुमारे तेराव्या शतकामध्ये ही परंपरा असल्याचे उल्लेख आढळतो. संत ज्ञानदेव, संत तुकाराम, संत नामदेव यांच्यासह अनेक संतांनी वारकरी धर्माची पताका खांद्यावर घेतली तसंच सर्व जातीपातींच्या लोकांना आणि समाजाला एकत्रितपणे या वारीच्या सोहळ्यात सामील करून घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत आजही वारीची परंपरा चालवली जाते असेही माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

आषाढी आणि कार्तिकी या दोन्ही एकादशीला ही वारी महत्त्वाची मानली जाते. त्यात आषाढी एकादशीची वारी ही खूपच मोठी आणि महत्त्वाची असल्याचे सांगितले जाते. आळंदीमधून संत ज्ञानेश्वर यांच्या पादुका आणि देहू या स्थळावरून संत तुकाराम यांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गस्थ होते. वारी हे सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असून वारकरी संप्रदायामध्ये लहान-मोठा, श्रीमंत-गरीब हा भेद नाही. वारकर्यांच्या मुखात केवळ विठ्ठलनामाचा गजर असतो. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

पंढरपुरात जाऊन चंद्रभागा नदीत स्नान करुन विठोबाचे दर्शन ही एकच इच्छा वारकऱ्याची मनात असते. याच भक्तीपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, अशी भागवत संप्रदायाची ठाम धारणा आहे. एकादशीला चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेणे याने प्राप्त होणारे आध्यात्मिक सुखाचे वर्णन शब्दात मांडणे अवघडच आहे. वारीसंदर्भात आज जागतिक स्तरावरही याचा अभ्यास सुरू आहे. जागतिक पातळीवरील वारीचा हा अनुभव घेण्यासाठी अनेक अभ्यासक, संशोधकही सहभागी होतात. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

आषाढी एकादशीला पंढरपुरला आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूवरून तुकारामांची, त्र्यंबकेश्वरवरून निवृत्तीनाथांची, पैठणहून एकनाथांची, नरसी नामदेव येथून संत नामदेवांची तर उत्तर भारतातून कबिराची पालखी पंढरपुरात येते. आषाढीच्या वारीला सुगीची उपमा दिली जाते. शेतकरी आपल्या शेतात पेरणी करतात आणि मग वारीसाठी निघतात. वारी करुन विठोबाचे दर्शन घेऊन घरी जाईपर्यंत त्यांच्या शेतात जोमाने झालेली वाढ बघून शेतकऱ्याला शक्ती मिळते. विठ्ठलाच्या भक्तीसाठी आसुसलेला प्रत्येक जण या वारीत सहभागी होतो तर वारीला जाऊ शकत नाहीत ते उपवास करून आपल्या विठ्ठलाची भक्ती करतात. असेही आमदार






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.